# डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना

**नूतनीकरण लाभार्थ्यांसाठी महत्वाची सूचना**

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना २०२२-२३ व २०२३-२४, २०२४ -२५ अंतर्गत अंतिम निवड यादीतील लाभार्थी यांनी (केवळ नूतनीकरण लाभार्थी) शिष्यवृत्ती वितरणासाठी आवश्यक कागदपत्रे खाली नमूद केलेल्या सूचनांनुसार प्रत्यक्ष किंवा पोस्टाद्वारे सारथी कार्यालय, पुणे येथे दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावीत.

➢ सादर करावयाची शुल्क संबंधित कागदपत्रे :

१. शिक्षण शुल्क (Tuition Fee)
२. विकास शुल्क (Development Fee)
३. परीक्षा शुल्क (Examination Fee)
४. नोंदणी शुल्क (Registration Fee)
५. ग्रंथालय शुल्क (Library Fee)
६. प्रयोगशाळा शुल्क (Laboratory Fee)
७. जिमखाना शुल्क (Gymkhana Fee)
८. संगणक शुल्क (Computer Fee)
९. वसतिगृह शुल्क (Hostel Fee)
१०. भोजन शुल्क (Mess/Dining Fee)
११. यापूर्वी शिष्यवृत्ती जमा झालेबाबत लाभार्थ्याचे बँक स्टेटमेंट
१२. मागील वर्षीचे निकालपत्रक (Marksheet)

➢ कागदपत्र सादरीकरणाबाबत महत्त्वाच्या सूचना :

- सर्व पावत्या स्पष्ट, वाचनीय व महाविद्यालयाच्या शिक्का-स्वाक्षरीसह असाव्यात.
- विद्यार्थ्याचे नाव, महाविद्यालयाचे नाव, अभ्यासक्रम, वर्ष व शुल्क घटक स्पष्टरीत्या नमूद असावेत.
- प्रत्यक्ष सादरीकरणाच्या वेळी मूळ व छायांकित प्रति (xerox) दोन्ही आवश्यक असल्यास तपासणीसाठी ठेवाव्यात.
- पोस्टाद्वारे कागदपत्रे पाठविताना लिफाफ्यावर स्पष्टपणे नमूद करावे: "देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना – शुल्क विवरण पत्र"
- लाभार्थ्यांनी सादर करावयाच्या कागदपत्रांमध्ये शुल्क पावत्यांचे मूळ/छायांकित प्रती महाविद्यालयाच्या अधिकृत शिक्क्यासह व स्वाक्षरीसह असणे अत्यावश्यक आहे. शिक्का व स्वाक्षरी नसलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, याची विशेष नोंद घ्यावी.
- सदर शुल्काचे विवरण व संबंधित कागदपत्रे दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यालयात प्राप्त होणे आवश्यक आहे. विलंबित, अपूर्ण अथवा अर्हताविहीन कागदपत्रे प्राप्त झाल्यास शिष्यवृत्ती प्रस्तावाच्या पुढील प्रक्रियेत त्यांचा विचार करता येणार नाही.

**टीप:** निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारी कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.